# ऑनलाईन शिक्षणावर पुनर्विचार हवा!

एका न दिसणाऱ्या विषाणूने पसरविलेल्या महामारीमुळे जगामध्ये अनेक क्षेत्रांमध्ये मोठे बदल घडून येत आहेत. याला शिक्षण क्षेत्र अपवाद नाही. यामध्ये ऑनलाईन अध्ययन-अध्यापन, परीक्षा म्हणजेच ऑनलाईन शिक्षणपद्धती विषयी जगातील शिक्षणतज्ज्ञ व मानसोपचारतज्ज्ञ विविध मते मांडत आहेत. आपल्या देशातही दिनांक २५ मार्चपासून टाळेबंदी सुरू आहे. त्यामुळे शाळा, महाविद्यालये सक्तीने बंद आहेत. या काळामध्ये ऑनलाईन शिक्षण, वेबिनार, जाणीव-जागृती कार्यक्रम, चाचण्या आदी यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

वास्तविक, जेव्हा या टाळेबंदी कालावधीमध्ये ऑनलाईन अध्यापन शिक्षकांनी करावे असे अचानक सांगण्यात आले तेव्हा शिक्षकांमध्ये सुरुवातीस संभ्रमावस्था निर्माण झाली असेल किंवा दडपण आले असेल. कारण, आपली शिक्षणपद्धती ही पूर्णपणे फेस-टू-फेस अशी आहे. गेली चार ते पाच दशके शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर हा अध्ययन अध्यापनासाठी शिक्षक विद्यार्थी समोरासमोर असताना केला जात आहे. पूर्णपणे विद्यार्थी समोर नसताना अभासी वर्गामध्ये अध्यापन करणे म्हणजेच ऑनलाईन वर्ग घेणे हे शिक्षकांना एक आव्हानच आहे. अध्यापन ही द्विमार्गी चालणारी एक जिवंत अशी शैक्षणिक प्रक्रिया आहे, असेच शिक्षकांच्या मनामध्ये रूजलेले आहे.

सुदैवाने भविष्यामध्ये अशा प्रकारची टाळेबंदी लागू नये; पण निसर्ग हा आपला सर्वात मोठा गुरू आहे व तो केव्हा आपल्याला काय शिकवेल हे सांगता येत नाही. त्यामुळे भविष्यामध्ये प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस आपण जेव्हा शैक्षणिक कॅलेंडर किंवा वार्षिक नियोजन करतो तेव्हापासूनच ऑनलाईन शिक्षणाचे प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये नियोजन करावे लागले. या अभ्यासक्रमातील सैद्धांतिक भाग व प्रात्यक्षिक भाग, त्यांचे घटक, आशय याची निश्चिती करूनच त्यावर ऑनलाईन अध्यापन करण्यासाठी प्रक्रिया करणे, रूपांतर करणे, विविध सामाजिक माध्यमांची किंवा ॲप्सची निवड करणे व त्यांचे मूल्यमापन कसे करता येईल हे जर सुरुवातीलाच ठरवले तर ऑनलाईन शिक्षण परिणामकारक होण्यास मदतच होईल.

## प्रासंगिक

वास्तविक, शिक्षण प्रक्रिया ही पूर्णपणे ऑनलाईन असू नये किंवा तशी वेळदेखील येऊ नये; पण भविष्यात आपल्याला पारंपरिक शैक्षणिक पद्धतीप्रमाणेच ऑनलाईन शिक्षण पद्धतीचे देखील जाणीवपूर्वक नियोजन करावे लागेल. यासाठी खालील कार्यपद्धती अवलंबिता येईल. १) अभ्यासक्रमातील ४० टक्के भाग पारंपरिक पद्धतीने शिकविण्याचे नियोजन करता येईल. यामध्ये प्रात्यक्षिक, क्षेत्र भेट, सर्वेक्षण, कौशल्य विकास उपक्रम व काही सैद्धांतिक भाग यांचा समावेश करता येईल. २) अभ्यासक्रमातील ३० टक्के भाग हा ऑनलाईन पद्धतीने शिकवण्याचा असेल व त्याची तयारी उदा. त्यावर आधारित ई-कंटेन्ट तयार करणे, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन तयार करणे आदींचा समावेश असेल. ३) उर्वरित ३० टक्के भाग हा ऑनलाईन किंवा ऑफलाईन अशा प्रकारे मिश्र स्वरूपाचा असेल व यासाठी फ्लिपड क्लासरूम या अध्ययन-अध्यापन पद्धतींचा समावेश करता येईल. ४) अशाप्रकारे ऑनलाईन किंवा ऑफलाईन अभ्यासक्रम निश्चित झाल्यावर पुढील शैक्षणिक वर्षाचे कॅलेंडर किंवा वार्षिक नियोजन करणे; पण ते लवचिक असणे गरजेचे आहे. यामध्ये शिक्षकांना स्वातंत्र्य असणे गरजेचे आहे व यासाठी सत्र पद्धतीपेक्षा वार्षिक पद्धती अधिक उपयुक्त ठरेल किंवा सत्रपद्धती मध्ये देखील प्रत्येक सत्रामध्ये ऑनलाईन व ऑफलाईन अध्यापन व मूल्यमापन यांचे नियोजन करावे लागेल. ५) शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची सुरुवातीलाच ऑनलाईन अध्यापन व मूल्यमापन या विषयी मानसिकता तयार करणे व त्यांच्याकडे तशा सोयीसुविधा आहेत का? उदा. इंटरनेट, स्मार्ट फोन, लॅपटॉप किंवा इतर आवश्यक साधने असण्याची खात्री करणे. ६) ऑनलाईन पद्धतीने निवडलेल्या आशयावर सुयोग्य अशा विविध ऑनलाईन मोडस् निश्चित करणे. ७) मूल्यमापनाची साधने ठरवणे, ऑनलाईन किंवा मिश्र पद्धतीने शिकविल्या जाणाऱ्या आशयासाठी किती गुण द्यावेत, कोणत्या प्रश्न पद्धतींचा उदा. वस्तुनिष्ठ, निबंधवजा अदी वापर करता येईल का याचे नियोजन करणे. म्हणजेच पूर्णतः ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा अवलंब न करता हे आव्हान टप्प्याटप्प्याने व विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेऊनच स्वीकारावे लागेल.

**- प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर**

# सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी यावर्षीच उपकेंद्र सुरू होणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात येणाऱ्या मराठी भाषिक महाविद्यालय अथवा शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र यावर्षीच सुरू होण्याची शक्यता आहे. महाविद्यालय अथवा उपकेंद्रांबाबत सहा सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीला तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी मराठी महाविद्यालय अथवा शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार दि.३० जून रोजी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे घेतलेल्या बैठकीत सहा सदस्यीय समिती स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार राज्य शासनाने बुधवारी प्रभारी कुलगुरू डॉ.नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय समितीची स्थापना केली आहे.

या समितीने जागेची उपलब्धता, पदनिर्मिती, पायाभूत सुविधा, निधीची आवश्यकता या घटकांची निश्चिती करावी. स्वतंत्र शासकीय महाविद्यालय अथवा उपकेंद्र स्थानप करण्याच्या प्रक्रियेला काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

यामुळे चंदगड अथवा गडहिंग्लज तालुक्यातील अथवा कोल्हापूर शहरात उपलब्ध असलेल्या इमारतीत अथवा राजाराम महाविद्यालयात तात्पुरत्या स्वरूपात केंद्र कार्यान्वित करता येईल का, तसेच यावर्षीपासूनच किमान उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी काही निवडक अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने सुरू करता येतील का, या अभ्यासक्रमाचे स्वरूप कसे राहील, याबाबत तातडीने शिफारशी कराव्यात, असे आदेश समितीला देण्यात आले आहेत. यामुळे यावर्षीपासूनच हे उपकेंद्र अथवा महाविद्यालय सुरू होण्याची शक्यता आहे.